ePaper

| वर्ष - 7 । अंक - 229 || UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । बुधवार, दिनांक 27 डिसेंबर 2023 पिंपरी-चिंचवड आवृत्ती mahaenews.com maha_enews Mahaenews

# देवेंद्र फडणवीसांच्या लेटरबॉम्बनंतरही नवाब मलिक आणि अजित पवारांची भेट!




## आतील पानांत

- भारताची फलंदाजी ढेपाळली
- रियाला कोर्टाचा मोठा दिलासा !
- खरगेंच्या दावेदारीवर पवार नाराज?
- 'वंचित'चा जागावाटपाचा फॉर्म्युला!


## नदी सुधार प्रकल्पाच्या बैठकीला

# स्थानिक आमदारांना डावलले?

### » बालेवाडी येथे शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांची बैठक

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**इंद्रायणी नदीचे सांस्कृतिक महत्व लक्षात घेता नदीत जाणारे दूषित, प्रक्रिया न केलेले सांडपाणी तातडीने रोखावे आणि सांडपाणी व्यवस्थापनावर विशेष भर द्यावा, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केले. दरम्यान इंद्रायणी नदी परिसरातील स्थानिक आमदार सुनील शेळके, आमदार महेश लांडगे, दिलीप मोहिते यांना या बैठकीचे निमंत्रणच देण्यात आले असल्याची माहिती समोर येत आहे.**





श्री शिव छत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे येथे आयोजित लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने इंद्रायणी नदी प्रदूषणाबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

बैठकीस आमदार उमा खापरे, पीएमआरडीए आयुक्त राहुल महिवाल, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव अविनाश ढाकणे, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुणाल खेमनार आदी उपस्थित होते.

दिपक केसरकर म्हणाले, प्रक्रिया न केलेले दूषित पाणी नदीत जाणार नाही याची दक्षता घ्यावी. सांडपाण्यावर प्रक्रिया करणारे नवे प्रकल्प उभारताना जुने प्रकल्पही सुरूच राहतील याकडे लक्ष द्यावे. नद्यांचे पाणी शुद्ध राहावे यावर मुख्यमंत्री महोदयांचा भर आहे. नमामि चंद्रभागा प्रकल्पाच्यादृष्टीने इंद्रायणीसोबतच मुळा-मुठा नदीतील प्रदूषण रोखण्याबाबतही विचार करावा लागेल. नद्यांमधील प्रदूषण रोखण्यासाठी मोठ्या गृहनिर्माण संस्थांचे सांडपाणी एकत्र करून त्यावर प्रक्रिया करण्याचा प्रयत्न करावा. नाल्यांमध्ये जाणारे प्रक्रिया न केलेले पाणी थांबविण्यासाठीही उपाययोजना करावी. गृहनिर्माण संस्थांद्वारे सांडपाण्यावर प्रक्रिया होत नसल्याचे आढळल्यास दंडात्मक कारवाई करावी.\अविनाश ढाकणे म्हणाले, २० हजार चौरस मीटरपेक्षा कमी क्षेत्रातील प्रकल्पाला मान्यता देताना सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारला असल्याची खात्री करून घ्यावी. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीतील उद्योगांद्वारे दूषित पाणी प्रक्रिया न करता नदीत जाताना आढळल्यास दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी पीएमआरडीएच्यावतीने इंद्रायणी नदी प्रदूषण रोखण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांविषयी सदारीकारणाद्वारे माहिती देण्यात आली.

### स्थानिक आमदारांना बैठकीचे निमंत्रणच नाही..!

»इंद्रायणी नदी प्रदूषण आणि पर्यावरणाच्या संदर्भामध्ये नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये झालेल्या चर्चेनुसार राज्याचे शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी आज बालेवाडी येथे बैठक घेतली. या बैठकीला केवळ विधान परिषदेचे आमदार उमा खापरे यांनाच निमंत्रित केले गेले. वास्तविक पाहता इंद्रायणी नदी परिसरातील आमदार महेश लांडगे, आमदार सुनील शेळके आणि आमदार दिलीप मोहिते यांनाही निमंत्रित करणे अपेक्षित होते. मात्र स्थानिक आमदारांना या बैठकीला का डावलण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

> “ स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाणी व्यवस्थापनावर प्राधान्याने लक्ष द्यावे. ग्रामीण भागात शोषखड्डे तयार करण्यावर भर द्यावा. नगरपालिकेने या विषयासाठी स्वतंत्र पथक तयार करावे. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारले जाईपर्यंत प्राथमिक उपाययोजनांद्वारे नद्यांमध्ये जाणारे दूषित पाणी रोखावे.
>
> -दीपक केसरकर, शालेय शिक्षण मंत्री

## थकीत पाणीपट्टी न भरल्यास पाणी पुरवठा बंद करण्याचा पुणे महापालिकेचा इशारा



। पुणे ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।

पाणीपट्टी थकविणाऱ्या केंद्र व राज्य सरकारी (PUNE) कार्यालये, संस्थांना प्रारंभी नोटीस बजावण्यात येणार आहे. त्यानंतर 31 जानेवारीपर्यंत थकीत पाणीपट्टी न भरल्यास पाणी पुरवठा बंद करण्याचा इशारा पुणे महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी दिला आहे. संबंधित कार्यालये, संस्थांना महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडून दरवर्षी पाणीपट्टी भरण्यासंदर्भात नोटीस पाठविली जाते. मात्र सरकारी, निमसरकारी कार्यालये असल्याने त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई होण्याची शक्यता नसल्याने संबंधित संस्थांकडून पाणीपट्टी भरण्याकडे दुर्लक्ष केले जाते. महापालिका प्रशासनाने मागील वर्षी शासकीय संस्थांकडील थकीत पाणीपट्टी वसूल करण्यासाठी विशेष मोहीमही राबविली होती. मात्र त्यालाही फारसा प्रतिसाद मिळाला नव्हता. पुणे कँटोन्मेंटकडे बोर्डाकडे 40 कोटी रुपयांची थकबाकी आहे. मागील वर्षी त्यांचा पाणी पुरवठा बंद केल्यानंतर त्यांनी तातडीने दोन कोटी रुपये भरले होते. त्यानंतर उर्वरित थकीत पाणीपट्टी अद्याप भरलेली नाही. याच पद्धतीने अन्य सरकारी संस्थांकडूनही पाणीपट्टी भरण्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे पाणीपट्टी वसूल करण्यासाठी महापालिका प्रशासनाने कडक भूमिका घेण्याचे ठरविले आहे. त्याविषयी आयुक्त विक्रम कुमार म्हणाले, “सरकारी संस्थांकडून पाणीपट्टी भरली जात नाही, त्यांना आता नोटीस बजावली जाईल, त्यानंतरही त्यांनी पैसे भरले नाहीत तर 31 जानेवारीनंतर त्यांचा पाणी पुरवठा बंद केला (PUNE) जाईल.”

# पाणीपट्टी थकवणाऱ्यांचे पाणी बंद!

## » थकबाकीबाबत पालिकेकडून कडक पावले उचलली जाणार

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शासकीय संस्थांकडे असलेल्या पाणीपट्टीच्या थकबाकीबाबत महापालिकेकडून कडक पावले उचलली जाणार आहेत. थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी संबधित संस्थांना नोटीस बजावण्यात येणार असून, ३१ जानेवारीपर्यंत थकबाकीची रक्कम न भरल्यास त्यांचा पाणीपुरवठा बंद करण्याचा आदेश महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी दिला.**



शहरात केंद्र, राज्य सरकारच्या अनेक कार्यालयांसह रेल्वेसह पुणे आणि खडकी कटक मंडळे आहेत. त्यांना महापालिकेकडून पाणीपुरवठा केला जातो. मात्र या सर्व विभागांकडे मोठ्या प्रमाणावर पाणीपट्टी थकली आहे. थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी महापालिकेकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येतात. मात्र त्याला प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे थकबाकीदार संस्थांना पुन्हा एकदा नोटीस बजावून थकबाकीची रक्कम भरण्यासाठी ३१ जानेवारीपर्यंतची मुदत दिली जाणार आहे. नोटीस बजावूनही थकबाकीची रक्कम न भरल्यास त्यांचा पाणीपुरवठा खंडित करण्यात येणार असल्याचे विक्रम कुमार यांनी सांगितले. महापालिकेने शासकीय संस्थांची थकबाकी वसूल करण्यासाठी गेल्यावर्षीही विशेष मोहीम राबवली होती. शासकीय संस्थांपैकी एकट्या पुणे कटक मंडळाकडे ४० कोटी रुपयांची थकबाकी आहे.

त्यामुळे कटक मंडळाचा पाणीपुरवठा गेल्यावर्षी बंद करण्यात आल्यावर कटक मंडळाने तातडीने दोन कोटी रुपयांची रक्कम भरली. मात्र त्यानंतर उर्वरित रक्कम भरण्यात आलेली नाही. हीच परिस्थिती अन्य संस्थांबाबतही असल्याने आता अधिक कडक कार्यवाही करण्यात येणार आहे. महाराष्ट्र जलजीवन प्राधिकरणाच्या माध्यमांतून देवाची उरूळी, फुरसुंगी आणि मंतरवाडीला पाणीपुरवठा करण्यासाठी योजना करण्यात आली आहे. त्यासाठीचा निधी महापालिकेने उपलब्ध करून दिला आहे. योजनेतील जलवाहिनी, साठवण टाकी आणि जलकेंद्राचे काम झाले असले, तरी रेल्वेमार्ग ओलांडून टाकाव्या लागणाऱ्या मुख्य वाहिनीच्या कामाला परवानगी मिळत नव्हती. त्यामुळे काम रखडले होते. रेल्वेने परवानगी दिल्यानंतर जलवाहिनीचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. तसेच फुरसुंगी परिसरासाठी मुठा उजवा कालव्यातून पाणी उचलण्यात येते. त्यासाठी कालव्यात पाणी सोडावे लागत असल्याने पाण्याचा अपव्यय होतो. या पार्श्वभूमीवर लष्कर जलकेंद्रातून थेट जलवाहिनी करून फुरसुंगीला पाणीपुरवठा केला जाणार आहे. त्यासाठीच्या जलवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. पुढील महिन्याभरात जलकेंद्रावर पंप बसवण्याचे काम पूर्ण करून देवाची उरूळी, फुरसुंगी आणि मंतरवाडीला जलवाहिनीद्वारे पाणीपुरवठा सुरू केला जाणार आहे. शहरात केंद्र, राज्य सरकारच्या अनेक कार्यालयांसह रेल्वेसह पुणे आणि खडकी कटक मंडळे आहेत. त्यांना महापालिकेकडून पाणीपुरवठा केला जातो. मात्र या सर्व विभागांकडे मोठ्या प्रमाणावर पाणीपट्टी थकली आहे. थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी महापालिकेकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येतात. मात्र त्याला प्रतिसाद मिळालेला नाही.

### भरण्यासाठी 31 जानेवारी मुदत

» थकबाकीदार संस्थांना पुन्हा एकदा नोटीस बजावून थकबाकीची रक्कम भरण्यासाठी ३१ जानेवारीपर्यंतची मुदत दिली जाणार आहे. नोटीस बजावूनही थकबाकीची रक्कम न भरल्यास त्यांचा पाणीपुरवठा खंडित करण्यात येणार असल्याचे विक्रम कुमार यांनी सांगितले. महापालिकेने शासकीय संस्थांची थकबाकी वसूल करण्यासाठी गेल्यावर्षीही विशेष मोहीम राबवली होती. शासकीय संस्थांपैकी एकट्या पुणे कटक मंडळाकडे ४० कोटी रुपयांची थकबाकी आहे.त्यामुळे कटक मंडळाचा पाणीपुरवठा गेल्यावर्षी बंद करण्यात आल्यावर कटक मंडळाने तातडीने दोन कोटी रुपयांची रक्कम भरली. मात्र त्यानंतर उर्वरित रक्कम भरण्यात आलेली नाही. महाराष्ट्र जलजीवन प्राधिकरणाच्या माध्यमांतून देवाची उरूळी, फुरसुंगी आणि मंतरवाडीला पाणीपुरवठा करण्यासाठी योजना करण्यात आली आहे.

# पुणे विद्यापीठाकडून विद्यार्थी संघटनांवर बंधने

## » विद्यार्थी कार्यक्रम, आंदोलनांसाठीची कार्यपद्धती निश्चित

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**काही दिवसांपूर्वी विविध संघटनांच्या वादातून तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर आता विद्यापीठाने विद्यार्थी संघटनांसाठी कार्यक्रम, उपक्रम, आंदोलनांसाठीची कार्यपद्धती निश्चित केली असून, विद्यार्थी संघटनांना उपक्रम, कार्यक्रमांसाठी किमान पाच दिवस आधी पूर्वपरवानगी, निश्चित केलेल्या जागेतच कार्यक्रम, उपक्रम आयोजित करण्याचे बंधन घालण्यात आले असून, विद्यापीठाचे नुकसान न होण्याबाबतचे लेखी हमीपत्रही द्यावे लागणार आहे.**

गेल्या महिन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विविध संघटनांमध्ये वाद होऊन हाणामारीची घटना झाली होती. त्यानंतर विद्यापीठात परस्परांच्या विरोधात मोर्चे काढण्यात आले. त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यापीठाच्या विनंतीनंतर पोलिसांनी विद्यापीठाच्या परिसरात जमावबंदी लागू केली होती. तसेच विद्यापीठ, पोलिसांनी संघटनांबरोबर बैठक घेऊन चर्चा केली. त्यात संघटनांसाठी कार्यपद्धती तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने कार्यपद्धती तयार करून त्याचा मसुदा जाहीर केला आहे. विद्यापीठाने तयार केलेल्या कार्यपद्धतीच्या मसुद्यानुसार विद्यापीठाच्या



आवारात कोणतेही उपक्रम, आंदोलन, कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन आणि पोलिसांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. पूर्वपरवानगीचा अर्ज दिला आणि त्याची पोहोच घेतली म्हणजे परवानगी दिली असे ग्राह्य धरले जाणार नाही. अर्ज ऐनवेळी किंवा उशिरा दिल्यास परवानगी दिली जाणार नाही, तरीही कार्यक्रम, उपक्रम, आंदोलन केल्यास, त्यावेळी काही अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित संयोजकांची असेल. कोणत्याही कार्यक्रम, उपक्रमांसाठी विद्यापीठातील संविधान स्मारकाशेजारील मोकळी जागा निश्चित करून देण्याचा निर्णय विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतला आहे. पोलीस प्रशासनाकडून परवानगी मिळाल्यानंतर त्याची प्रत विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाला देणे बंधनकारक आहे. परवानगीशिवाय कार्यक्रम, उपक्रम केल्यास, नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. कार्यक्रम, उपक्रमावेळी विद्यापीठाच्या स्थावर आणि जंगम मालमत्तेचे नुकसान होणार नाही याबाबतचे लेखी हमीपत्री द्यावे लागणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### संघटनांबरोबर 8 जानेवारीला बैठक

**» विद्यापीठाने जाहीर केल्याप्रमाणे विद्यार्थी संघटनांसाठीची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. संघटनांचे अध्यक्ष व सचिव यांच्याशी चर्चा करून त्यास अंतिम स्वरूप दिले जाणार आहे. त्यासाठीची बैठक ८ जानेवारी रोजी दुपारी चार वाजता विद्यापीठात होणार असल्याची माहिती परिपत्रकाद्वारे देण्यात आली. किमान पाच दिवस आधी पूर्वपरवानगी, निश्चित केलेल्या जागेतच कार्यक्रम, उपक्रम आयोजित करण्याचे बंधन घालण्यात आले असून, विद्यापीठाचे नुकसान न होण्याबाबतचे लेखी हमीपत्रही द्यावे लागणार आहे.**

# मेट्रोचा प्रवास सुलभ!

## »प्रवाशांसाठी गुड न्यूज: गर्दीच्या वेळी साडेसात मिनिटाला गाडी

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पुणे मेट्रोला प्रवाशांचा प्रतिसाद वाढत असल्याने मेट्रोने आपल्या परिचालनात सुधारणा केली आहे. नियमित सुरु असलेल्या फेऱ्यांची वारंवारीता वाढवून दोन फेऱ्यांमधील वेळ कमी केला आहे. मेट्रोच्या प्रवाशांना 1 जानेवारी पासून सकाळी 8 ते 11 आणि सायंकाळी 4 ते 8 या गर्दीच्या वेळी दर साडेसात मिनिटाला मेट्रो उपलब्ध असेल.**



1 ऑगस्ट 2023 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुणे मेट्रोच्या गरवारे कॉलेज स्थानक ते रुबी हॉल क्लीनिक स्थानक आणि फुगेवाडी स्थानक ते सिव्हिल कोर्ट इंटरचेंज स्थानक या मार्गाचे लोकार्पण झाले. या मार्गावर प्रवासी सेवेचा विस्तार झाला. पुणे मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातील पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट (मार्गिका एक) आणि वनाझ ते रामवाडी (मार्गिका दोन) मिळून एकूण 24 किलोमीटर मार्गावर प्रवासी सेवा सुरु झाली आहे. उर्वरित 9 किलोमीटर मार्गाचे काम पूर्णत्वाकडे आले असून लवकरच पुणे मेट्रोची पहिल्या टप्प्यातील संपूर्ण मार्गिका प्रवाश्यांसाठी खुली करण्यात येणार आहे.

पुणे मेट्रोचा प्रवासासाठी होणारा वाढता वापर आणि नवीन वर्षानिमित्त पुणे मेट्रो आपल्या प्रवासी सेवेचा विस्तार करीत आहे. पुणे मेट्रोची सेवा सकाळी 6 ते रात्री 10 या वेळेत सुरु असते. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेत नवीन वर्षानिमित्त पुणे मेट्रोने फेऱ्यांची वारंवारीता वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. 1 जानेवारी 2024 पासून मेट्रो दोन्ही मार्गिकांवर सकाळी 6 ते सकाळी 8 या वेळेत मेट्रो दर 10 मिनिटांच्या वारंवारतेनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट (मार्गिका एक) आणि वनाझ ते रामवाडी (मार्गिका दोन) दरम्यान प्रत्येकी 12 फेऱ्या, सकाळी 8 ते 11 दर 7.5 मिनिटांच्या वारंवारतेनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट (मार्गिका एक) आणि वनाझ ते रामवाडी (मार्गिका दोन) दरम्यान प्रत्येकी 24 फेऱ्या, सकाळी 11 ते दुपारी 4 या वेळेत दर 10 मिनिटांच्या वारंवारतेनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट (मार्गिका एक) दरम्यान 32 आणि वनाझ ते रामवाडी (मार्गिका दोन) दरम्यान 30 फेऱ्या, दुपारी 4 ते रात्री 8 या वेळेत दर 7.5 मिनिटांच्या वारंवारतेनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट (मार्गिका एक) आणि वनाझ ते रामवाडी (मार्गिका दोन) दरम्यान प्रत्येकी 32 फेऱ्या आणि रात्री 8 ते रात्री 10 या वेळेत दर 10 मिनिटांच्या वारंवारतेनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट (मार्गिका एक) आणि वनाझ ते रामवाडी (मार्गिका दोन) दरम्यान प्रत्येकी 13 फेऱ्या प्रत्येक स्थानकावरून उपलब्ध होणार आहे.

### स्वारगेट- पिंपरी 111 फेऱ्या...

» यामुळे प्रवाशांच्या प्रतिक्षेचा कालावधी कमी होऊन त्यांच्या वेळेची बचत होण्यास मदत होईल. त्याच बरोबर मेट्रोची दिवसांमधील वारंवारता वाढणार आहे. आतापर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट (मार्गिका एक) या दरम्यान दिवसभरात 81 फेऱ्या होत असत. त्यात वाढ होऊन 1 जानेवारी 2024 पासून 113 फेऱ्या होणार आहेत. वनाझ ते रामवाडी (मार्गिका दोन) दरम्यान दिवसभरात 80 फेऱ्या होत असत त्यात वाढ होऊन 1 जनवरी 2024 पासून 111 फेऱ्या होणार आहेत. गर्दीच्या वेळेत पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट (मार्गिका एक) आणि वनाझ ते रामवाडी (मार्गिका दोन) दरम्यान सहा मेट्रो ट्रेन कार्यान्वित होत्या. त्यात 1 जानेवारी पासून 8 मेट्रो ट्रेन कार्यान्वित होणार आहेत. कमी गर्दीच्या कालावधीत 6 मेट्रो ट्रेन धावतील.

“1 जानेवारी 2024 पासून होणाऱ्या प्रवासी सेवेच्या विस्तारामुळे मेट्रोच्या प्रवासी वेळेत जास्तीत जास्त लोकांना प्रवास करणे शक्य होणार आहे. यामुळे प्रवाशांच्या वेळेची देखील बचत होणार आहे. मेट्रोची वारंवारीता वाढल्याने सकाळी व संध्याकाळी ऑफिस जाण्याच्या/ येण्याच्या वेळेत होणारी गर्दी कमी होईल.”

**-श्रावण हर्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो**

# शहरात ‘इयर एंडिंग’ची तयारी जोरात!

## »पोलीस प्रशासनाची सतर्कता : हॉटेल, रेसॉर्टचे बुकिंग तेजीत

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विकेंडला इयर एंडिंग देखील आहे. त्यामुळे नाचगाणे, मजा मस्ती, धमाल करण्यासाठी अनेकांचे प्लॅन सुरु झाले आहेत. डीजेच्या दणदणाटात सरत्या वर्षाला निरोप देऊन नवीन वर्षाचे स्वागत करण्याची तयारी सुरु आहे.**




यासाठी हॉटेल, रेसॉर्ट, पार्टी हॉल, लॉन, रुफटॉप आदिंचे बुकिंग जोरात सुरु आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून देखील काही खबरदारी घेतली जात आहे.

पिंपरी-चिंचवड शहरालगत हिंजवडी, तळवडे येथे मोठ्या प्रमाणात आयटी कंपन्या आहेत. या कंपन्यांना शनिवार आणि रविवार अशी दोन दिवस सुट्टी असते. त्यात यावर्षीचा इयर एंड रविवारी होत आहे. त्यामुळे आयटीयंस जरा जास्तच खुश आहेत. सर्वच स्तरातील लोकांना नवीन वर्षाचे वेध लागलेले असतात. पण त्यात आयटीयंसचा उत्साह थोड्याफार प्रमाणात अधिकच असतो. याच आयटीयंसच्या आवडी निवडी समोर ठेऊन अनेक हॉटेल मालकांनी 31 डिसेंबरच्या पार्ट्यांचे जंगी नियोजन केले आहे. आगाऊ बुकिंगद्वारे विविध पॅकेजेस दिले जात आहेत. रविवार आणि 31 डिसेंबर हा दुहेरी योग जुळून आल्याने अनेकांच्या आनंदाला पारावार उरलेला नाही. याच पार्श्वभूमीवर शहरासह आजूबाजूच्या परिसरातील हॉटेल्स देखील आगाऊ बुकिंग घेऊ लागली आहेत. शनिवार आणि रविवार मावळ, मुळशी मधील परिसर पर्यटकांच्या गर्दीने फुलून जाणार आहे. दिवसभर पर्यटन स्थळी भटकंती करून रात्रीच्या वेळी मस्त एन्जॉय करण्याचा मूड प्रत्येकजण बनवत आहे.

### शहरात रात्रभर नाकेबंदी...

»नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन देखील तयार झाले आहे. नवीन वर्षाच्या स्वागताच्या आनंदावर कुठेही विरजण पडू नये यासाठी पोलिसांकडून पुरेशी खबरदारी घेतली जात आहे. हॉटेल चालकांना वेगवेगळे परवाने देताना अनेक बाबींची पडताळणी केली जात आहे. प्रत्येक ग्राहकाला सुरक्षितपणे घरी पोहोचविण्याची लेखी हमी हॉटेल चालकांकडून घेतली जात आहे. मद्य प्राशन करून वाहन चालवू नये, असे आवाहन पोलिसांकडून केले आहे. त्या दृष्टीने पोलीस 31 डिसेंबर रोजी रात्रभर नाकेबंदी लावणार असून गस्त देखील वाढवणार आहेत.




# कुस्तीतले बाहुबली आजही मोकाट

**कुस्ती महासंघाच्या कार्यकारिणीची निवडणूक झाल्यानंतर दोन दिवसांतच तिच्या निलंबनाचे आदेश देताना क्रीडा मंत्रालयाने अत्यंत तांत्रिक मुद्दयांचा आधार घेतलेला आहे. तेव्हा काही कुस्तीगिरांच्या आक्रोशाची दखल घेऊन क्रीडा मंत्रालय वा केंद्र सरकारने तातडीने पावले उचलली असा जो समज या घटनाक्रमातून पसरवला जात आहे.**

तो वस्तुस्थितीदर्शक नाही. त्याहीपेक्षा महत्त्वाची घोषणा महासंघाचे वादग्रस्त माजी अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांनी केली. मी आता कुस्तीपासून दूर राहण्याचे ठरवले आहे, असे त्यांनी सांगितले. हे शहाणपण त्यांना जरा उशिरानेच सुचले. सुचले म्हणण्यापेक्षा 'सुचवले गेले' असे म्हणणे अधिक योग्य. कारण या घोषणेआधी त्यांनी भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची भेट घेतली होती. यावरून त्यांचे बोलविते धनी कोण हे लक्षात येते. ब्रिजभूषण यांच्या घोषणेत अनेक अर्थ दडले आहेत. म्हणजे 'येथून पुढे' हे ब्रिजभूषण भारतीय कुस्तीशी संलग्न राहणार नाहीत. वास्तविक हे त्यांनी खूप आधीच करायला हवे होते. कारण क्रीडा संहितेनुसार (जी भारतीय ऑलिम्पिक संघटनेने सन २०११ मध्येच स्वीकारली आहे) तीन कार्यकाळ संपल्यानंतर ब्रिजभूषण यांनी नियमानुसार महासंघाची सूत्रे सोडून द्यायला हवी होती. हे घडले



नाही. त्यानंतर कुस्तीगिरांनी महिला कुस्तीगिरांच्या शोषणाच्या कहाण्या जनतेसमोर मांडल्या. तरीदेखील ब्रिजभूषण ढिम्म हलले नाहीत. कुस्ती महासंघाचा कारभार त्यांच्या दिल्लीतील निवासस्थानावरून चालायचा. याच वास्तूमध्ये काही महिला कुस्तीगिरांचे शोषण झाल्याचा आरोप आहे. तरीदेखील कुस्ती महासंघाच्या निवडणुकीमध्ये ब्रिजभूषण यांचेच चेले संजय सिंह निवडून आले. त्यांच्या विजयानंतर आपणच जिंकल्याच्या थाटात गळयात विजयमाळा घालून ब्रिजभूषण मिरवत होते. त्यांच्याइतकेच टगे असलेले त्यांचे चिरंजीवही 'दबदबा था, दबदबा रहेगा' असे समाजमाध्यमांवर बरळून गेले. एरवी हेही खपून गेले असते. क्रीडा संघटनांच्या धनकुंभाला भुजंगासारखे लपेटून बसलेले राजकारणी या देशात काही कमी नाहीत. परंतु ज्या संघटनेचे आपण अध्यक्ष, त्याच संघटनेशी संलग्न असलेल्या खेळाडूंच्या – विशेषत: महिला आणि युवतींच्या – शोषणाचा आरोप असलेल्या व्यक्तीविरोधात पोलिसी आणि न्यायालयीन कारवाई सुरू असताना तिचे अशा प्रकारे उजळ माथ्याने वावरणे आणि झळकणे अतिशय संतापजनक होते. परंतु ब्रिजभूषण शरण सिंह हे सत्तारूढ पक्षाशी आणि सत्तारूढ पक्षाच्या दृष्टीने अतिशय मोक्याच्या असलेल्या राज्याशी संबंधित आहेत. तरीही त्यांच्याविरोधात झालेल्या आरोपांचे स्वरूप पाहता, त्यांचे अगदी अलीकडेपर्यंत कुस्ती महासंघाचे सूत्रधार असणे हे सत्ताधारी पक्षासाठीही नामुष्कीजनक ठरते. यासंदर्भात क्रीडा मंत्रालयाच्या भूमिकेचीदेखील चिकित्सा झाली पाहिजे. केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी सोयीस्कर वेळी नियमांचा आधार घेतला, असेच म्हणावे लागेल. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक संघटनेने घालून दिलेल्या आणि आपल्या बहुतेक क्रीडा संघटनांनी स्वीकारलेल्या क्रीडा संहितेचा एक महत्त्वाचा नियम म्हणजे, सरकार किंवा राजकीय पक्षांचा हस्तक्षेप अस्वीकारार्ह असणे. कागदोपत्री तो पाळला जात असला, तरी काही देशांमध्ये प्रत्यक्षात त्याचे पालन होत असेलच असे नाही. भारतही याला अपवाद नाही. पण ज्या वेळी कुस्तीगीर या वर्षांच्या सुरुवातीपासून संसदेपासून हाकेच्या अंतरावर ब्रिजभूषणविरोधात आंदोलन करत होते, त्या वेळी त्यांची दखल सुरुवातीस तरी फारशी घेतली गेली नाही. आता नवनियुक्त कार्यकारिणीने नियमांना डावलून परस्पर ज्युनियर स्पर्धांची घोषणा केली, या तांत्रिक मुद्दयावर ती बरखास्त करण्याचा निर्णय क्रीडा मंत्रालयाने घेतला. याशिवाय कुस्ती महासंघाचा कारभार हाकण्यासाठी हंगामी समिती स्थापावी असे निर्देश भारतीय ऑलिम्पिक समितीला क्रीडा मंत्रालयाने दिले आहेत. हा हस्तक्षेप ठरू शकतो. तो करायचाच होता, तर ब्रिजभूषण हाकत असलेल्या संघटनेच्या कारभारात व्हायला हरकत नव्हती. किमान त्यामुळे जनतेची सहानुभूती तरी मिळाली असती. पण ब्रिजभूषण यांचे बाहुबली उपद्रवमूल्य त्यांच्या राजकीय वजनासमोर क्षुल्लक ठरवले गेले.

## संपादकीय »

### कैदखाना जुना

***लष्कराने चौकशीच्या मिषाने आठ नागरिकांस 'ताब्यात' घेतले आणि त्यातील तीन मरण पावले तर पाच जण जखमी अवस्थेत रुग्णालयात उपचार घेत आहेत.***

पौरुषी राष्ट्रवादाचा उदो उदो करणारे नागरी समस्यांसाठी लष्करी बळाचा वापर करण्याची चूक इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर करीत आलेले आहेत आणि प्रत्येक वेळी या कथित पौरुषातील पोकळपणा उघड झालेला आहे. नागरी समस्यांस लष्करी उपाय हा पर्याय असू शकत नाही आणि नागरी समस्यांवरील उत्तर नागरी उपायांतूनच यावे लागते. तसे ते आले तरच ते चिरंतन नाही तरी दीर्घकाळ टिकणारे असते. या सत्याची ताजी प्रचीती जम्मू-काश्मिरात घडणाऱ्या घटनांतून येईल. त्या राज्यात पाकिस्तानी हस्तक्षेपास नागरी ताकद रोखू शकत नाही हे खरे आणि त्याचमुळे या घुसखोरीस लष्करी उतारा हवा हेही खरे. पण तसे झाल्यानंतर, भारत-पाकिस्तान सीमेवर बंदोबस्त केल्यानंतर त्या प्रांतांतील घटनांची हाताळणी नागरी उपायांनीच हवी. यांत सरमिसळ झाल्यास अनवस्था प्रसंग ओढवतो.

**२५ डिसेंबर रोजी आपण सुशासन दिन म्हणून साजरी केली. यानिमित्ताने देशाच्या उच्च नागरी सेवेला सुशासनाची दिशा देणाऱ्या सरदार पटेल यांच्या दूरदर्शी नेतृत्वाचेही स्मरण केले पाहिजे. पटेल यांनी १९४७ मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांना दिलेला सल्ला आजही खरा ठरतो.**

# मोदी 'सुशासित भारत' साकारताहेत!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'सुधारणा करा, कार्य करा आणि परिवर्तन करा' असा मंत्र दिला आहे. गेल्या १० वर्षांत विकासाचा कॅनव्हास मोठया प्रमाणात बदलला आहे आणि प्रशासनाला कदाचित पूर्वी नसेल असे ठळक स्वरूप प्राप्त झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ डिसेंबर २०२३ रोजी 'विकसित भारत संकल्प यात्रा' सुरू केली. भारताच्या ऐतिहासिक प्रवासातील हा एक निर्णायक क्षण आहे – १.४ अब्ज लोकांचे हे राष्ट्र मोठे स्वप्न पाहत आहे. उपजीविकेच्या संधी वाढवणे, तरुण आणि महिलांचे उत्पन्न वाढवण्याची इच्छा यामागे आहे. संपत्ती आणि रोजगार निर्माण करण्यासाठी गुंतवणूकदार-अनुकूल परिसंस्थेद्वारे उद्योजक आणि गुंतवणूकदारांना प्रोत्साहित करण्याची क्षमताही आता आपल्याकडे आहे. हे असे राष्ट्र आहे की ज्यात विकासापासून कोणालाही वंचित ठेवले जाणार नाही. गेल्या काही वर्षांत सरकारने आपल्या लोकांच्या प्रचंड क्षमतेवर अभूतपूर्व विश्वास ठेवला



आहेच आणि लोकसहभागातून अनेक प्रकल्प यशस्वीही करून दाखवले आहेत. स्वच्छतेला लोकचळवळीचे रूप देऊन, ते साकार करू शकणारे हे सरकार आहे. लोकसहभाग हे कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचे प्रमुख तत्त्व झाले आहे. लोकांना त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी, माहिती आणि ज्ञान मिळवण्यासाठी अधिकाधिक सक्षम करून 'बदलाचे कर्ते' ही नवी ओळख दिली जाते आहे. सुशासन हा सामाजिक परिवर्तनाचा, 'सुराज्या'च्या स्थापनेसाठीचा सर्वात आश्वासक मार्ग बनला आहे. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' अशी सर्वसमावेशक विकासाची चौकट मांडत पंतप्रधानांनी या परिवर्तनाच्या प्रवासाचे नेतृत्व केले आहे, ज्यात जबाबदार नागरिकत्वाचा घटक जोडला गेला आहे. आणि 'सबका प्रयास'द्वारे सहभागात्मक विकासाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. 'फायनान्शिअल टाइम्स' या परदेशी वृत्तपत्राला २१ डिसेंबर रोजी दिलेल्या मुलाखतीत पंतप्रधान मोदी सार्थपणे म्हणतात की "आमचा देश 'टेक ऑफ'च्या उंबरठयावर आहे"! दारिद्रय निर्मूलनापासून ते साथीच्या रोगांशी लढा देण्यापर्यंत, मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान बळकट करण्याच्या राष्ट्रीय मिशनपासून ते जागतिक दर्जाची विद्यापीठे तयार करण्यापर्यंत, मोठया आर्थिक समावेशन कार्यक्रमापासून प्रभावी आरोग्य विमा योजनेपर्यंत, सातत्याने विस्तारत जाणारी आधुनिक रेल्वे आणि विमानचालन क्षेत्र ते नेत्रदीपक अंतराळ मोहिमेपर्यंत, तंत्रज्ञान आणि फार्मास्युटिकल्समधील प्रगतीपासून ते क्रीडा प्रतिभेचे पालनपोषण करण्यापर्यंत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मविआ शेतकऱ्यांच्या प्रश्नावर रान पेटवणार

## 'शेतकरी आक्रोश मोर्चा, शरद पवारांच्या उपस्थितीत सांगता

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाविकास आघाडीच्या वतीने काढण्यात येणाऱ्या 'शेतकरी आक्रोश मोर्चा'ची तयारी पूर्ण झाली असून उद्या (दि. २७) जुन्नर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करुन या मोर्चाला प्रारंभ होणार आहे. खासदार शरद पवार यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे या मोर्चाची सांगता होणार आहे.**

खासदार सुप्रिया सुळे आणि खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर संसदेत आवाज उठविल्यानंतर त्यांचे निलंबन करण्यात आले. त्यानंतर खासदार सुप्रिया सुळे आणि डॉ. कोल्हे यांनी 'शेतकरी आक्रोश मोर्चा'चे आयोजन करण्याचा निर्णय घेतला. कांदा निर्यात बंदी तात्काळ उठवणे आणि निर्यातीसाठी कायमस्वरूपी धोरण, खासगी व शासकीय असा भेद न करता दूध उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान, बिबटप्रवण तालुक्यात शेतीसाठी दिवसा अखंडित वीजपुरवठा, पीक विमा कंपन्यांच्या मनमानीला आळा घालून तातडीने नुकसान भरपाई, शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी, त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी निश्चित 'शैक्षणिक कर्ज' धोरण लागू करणे आदी प्रमुख मागण्यांसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना आणि कॉंग्रेससह महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी हा एल्गार पुकारला असून २७ ते ३० डिसेंबर दरम्यान भव्य 'शेतकरी आक्रोश मोर्चा' आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती खासदार सुळे आणि अमोल कोल्हे यांनी दिली. उद्या ( दि. २७) सकाळी ८ वाजता या मोर्चाला सुरुवात होणार असून ओतूर येथे पदयात्रा व कोपरा सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

आळेफाटा येथे कोपरा सभा व नारायणगाव येथे एस.टी. स्टॅंडजवळ पदयात्रा होणार असून ठिकठिकाणी शेतकऱ्यांकडून या आक्रोश मोर्चाचे स्वागत केले जाणार आहे. दुपारी ३ वाजता कळंब येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर कोपरा सभा आणि मंचर बाजार समिती येथून




पदयात्रेने लक्ष्मी रोड मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मोठी सभा होणार आहे. सायंकाळी ६.३० वाजता राजगुरुनगर बाजार समिती येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या कार्यालयाजवळ सभा आणि त्यानंतर राजगुरुनगर एस.टी. स्टॅंड येथील हुतात्मा राजगुरू आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन पाबळ चौकातून वाहनांद्वारे हा मोर्चा चाकणकडे रवाना होईल. चाकण बाजार समिती प्रवेशद्वारापासून रात्री ८ वाजता काढण्यात येणाऱ्या पदयात्रेचा समारोप बाजारपेठेतून एस.टी.स्टॅंड, तळेगाव चौक येथे होईल. त्यानंतर चौफुला, करंदी मार्गे केंदूर येथे मोर्चाचा पहिला मुक्काम होईल, असे त्यांनी सांगितले. गुरुवारी (दि. २८) सकाळी केंदूर येथील श्रीराम चौकात सभा आयोजित करण्यात आली असून पाबळ येथील लोणी चौकात कोपरा सभा होईल. त्यानंतर धामारी, मुखी, जातेगाव या ठिकाणी शेतकऱ्यांनी स्वागत केल्यानंतर दुपारी दीड वाजता शिक्रापूर येथे पाबळ चौक ते चाकण चौक अशी पदयात्रा काढण्यात येणार आहे. दुपारी दोन वाजता तळेगाव ढमढेरे येथील सावता माळी सभागृहात सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यानंतर टाकळीभीमा, पारोडी, दहीवडी, उरळगाव मार्गे न्हावरा येथे हा मोर्चा येईल. न्हावरा येथे तळेगाव फाटा ते निर्विदरम्यान पदयात्रा आणि पुढे निर्वि, कोळगाव डोळस, कुरुळी, वडगाव रासाई मार्गे मांडवगण फराटा येथे आल्यानंतर या ठिकाणी सभा होईल आणि पुढे तांदळी, काष्टी मार्गे दौंड येथे मुक्काम, असे नियोजन करण्यात आल्याचे कोल्हे यांनी स्पष्ट केले. शुक्रवारी (दि. २९) सकाळी नऊ वाजता दौंड येथील महात्मा फुले पुतळा ते आंबेडकर चौक, गांधी चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा दरम्यान पदयात्रा काढण्यात येणार असून त्यानंतर मोर्चा कुरकुंभ, मळद, रावणगाव मार्गे खडकी येथे येईल. याठिकाणी बारामती चौकातील ग्रामपंचायत कार्यालयाजवळ मोर्चाचे रुपांतर सभेत होईल. त्यानंतर भिगवण आणि पळसदेव येथे कोपरा सभा करुन दुपारी अडीच वाजता मोर्चा इंदापूर येथे येईल. इंदापूर येथे पदयात्रा झाल्यानंतर निमगाव केतकी येथे कोपरा सभा, आणि तेथून मसाळवाडी, काटेवाडी, लिमटेक, पिंपळी, बांदलवाडी मार्गे मोर्चा बारामती येथे आल्यानंतर नगरपालिकेसमोर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर बारामती येथे मुक्काम होईल, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

### मोठ्या संख्येने सहभागी व्हा: सुप्रिया सुळे

» शनिवारी (दि. ३०) बारामती येथून मेडद, कऱ्हावागज, जळगाव, माळवाडी, तारडोळी मार्गे मोरगाव येथे मोर्चा आल्यावर मयुरेश्वराचे दर्शन घेऊन मंदिरासमोर कोपरा सभा होईल. त्यानंतर आंबी बु. मार्गे जेजुरी येथे कोपरा सभा होऊन मोर्चा शिंदवणे मार्गे हवेली तालुक्यात प्रवेश करेल. शिंदवणे येथे स्वागत स्वीकारुन उरळीकांचनला रवाना होईल. या ठिकाणी जुन्या इलाईट हॉटेलसमोर कोपरा सभा होणार असून सोरतापवाडी फाटा, कुंजीरवाडी फाटा, थेऊर फाटा मार्गे लोणी काळभोर येथे आल्यावर रेल्वे स्टेशनजवळ कोपरा सभेचे आयोजन करण्यात आले आहे. लोणी काळभोर येथून कवडीपाट टोलनाका मार्गे मांजरी फार्म, शेवाळवाडी फाटा, १५ नंबर, हडपसर गाडीतळ मार्गे पुण्यात जिल्हाधिकारी कार्यालय येथे हा मोर्चा जाईल. जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ महाविकास आघाडीच्या वतीने जाहीर सभा होणार असून खासदार शरद पवार, संजय राऊत यांच्यासह महाविकास आघाडीच्या घटक पक्षांचे नेते याठिकाणी उपस्थित राहणार आहेत. देशाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाच्या न्याय्य मागण्यांसाठी काढण्यात येत असलेल्या या 'शेतकरी आक्रोश मोर्चा'त शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन खासदार सुप्रिया सुळे आणि डॉ. अमोल कोल्हे यांनी केले असून पुण्यातील सभेला उपस्थित राहून शेतकऱ्यांच्या मागे ठामपणे उभे असल्याचा संदेश द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# 'वंचित'ने जाहीर केला जागावाटपाचा फॉर्म्युला!

## चंद्रशेखर बावनकुळे शिष्टाई करण्यासाठी माढाच्या दौऱ्यावर

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**नरेंद्र मोदी यांना सत्तेतून हटवणे हा आमचा मुख्य अजेंडा आहे असं सांगत वंचित बहुजन आघाडीने (VANCHIT BAHUJAN AGHADI) महाराष्ट्रातील लोकसभेच्या जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर केला. महाराष्ट्रातील विरोधी पक्षाने प्रत्येकी 12 जागांवर निवडणूक लढवावी असं वंचितकडून आवाहन करण्यात आलं आहे.**

कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना आणि वंचित बहुजन आघाडी या चार पक्षांमध्ये लोकसभेच्या 48 जागांची समान विभागणी करावी. प्रत्येकी 12 जागा घेऊन सर्व पक्षांनी एकत्रित मोदींचा पराभव करावा असा आमचा फॉर्म्युला असल्याचे वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर यांनी सांगितले. आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी औरंगाबाद येथे वंचित बहुजन आघाडीच्या राज्य कार्यकारणीची बैठक पार पडल्यानंतर पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या. लोकसभेमध्ये कॉंग्रेससहीत कोणत्याच पक्षाची स्वबळावर पंतप्रधान निवडून आणण्याची ताकद नाही. त्यामुळे जागा वाटपावरून रस्सीखेच करण्यात अर्थ नाही. विधानसभेत मुख्यमंत्री होण्याची ताकद या पक्षात आहे, त्यावेळी जागावाटपासाठी भांडू, पण आता ती वेळ नाही, असे त्यांनी म्हटले आहे. महाविकास आघाडीतील तीनही पक्ष केंद्रामध्ये स्वबळावर पर्याय होऊ शकण्याच्या परिस्थितीत नाहीत. दोन पक्ष फुटीमुळे कमकुवत आहेत. कॉंग्रेसचा मागच्यावेळी एकच खासदार होता. त्यामुळे हे तीनही पक्ष पर्याय होऊ शकत नाही. मागच्या लोकसभा निवडणुकीतून अस दिसून आले आहे की, वंचित बहुजन आघाडीकडे मते आहेत. गेल्या पाच वर्षांत वंचित चा जनाधार वाढला असल्याचं रेखाताई ठाकूर यांनी स्पष्ट केले. या निवडणुकीत मोदींना पराभूत करणे हाच आमचा अजेंडा आहे. कोणीही अती आत्मविश्वास बाळगू नये, सध्या तशी परिस्थीती नाही, असा सल्ला रेखाताई ठाकूर यांनी महाविकास आघाडीतील पक्षांना दिला आहे.

विरोधकांनी मोदींना सत्तेतून हरवले नाही तर जेलमध्ये जावे लागेल. सत्तेवर असताना छोट्या मोठ्या चुका होतात, त्यामुळे जेलमध्ये टाकण्याची आवश्यकता नसते. मोदी-शाह ज्या प्रमाणे वागत आहेत, ते योग्य नाही. योग्य काळात निर्णय व्हायला पाहिजे. उरलेले तीन पक्ष हे सवर्ण लोकांचे पक्ष आहेत, संविधान बदललं तर यांना फार फरक पडणार नाही. कारण सवर्ण समाजाला सुरक्षा देण्याचेच मोदीचे धोरण आहे. संविधानातील बदलामुळे शूद्र, अतिशूद्र, ओबीसी, भटके विमुक्त, आदिवासी, दलीत, मुस्लिम, वंचितांना आणि अल्पसख्याकांच्या सुरक्षिततेवर परिणाम होईल.

### प्रत्येकाने समसमान जागांवर लढावं

» आमच्या वाट्याला आलेल्या 12 जागांपैकी कमीत कमी ३ उमेदवार हे मुस्लीम राहतील. ज्या समुहासाठी वंचित बहुजन आघाडी राजकीय भूमिका घेत आहे. ते जे वंचित समूह ओबीसी, व्ही.जे.एनटी यांच्यासाठी देखील योग्य प्रतिनिधित्व आम्ही देऊ जे इतर प्रस्थापित पक्ष देत नाहीत. आमची भावना हीच आहे की सर्वांनी एकत्रित येऊन लढल पाहिजे. केंद्रात मोदींना पराभूत करणं हा अजेंडा समोर ठेवून लवकरात लवकर निर्णय घेतला पाहिजे हिच वंचित बहुजन आघाडीच्या राज्य कार्यकारणीची भूमिका असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेतून सांगितले.

# खरगेंच्या दावेदारीवर पवार नाराज?

## » जनतेला बदल हवा असेल तर ते वेगळा निर्णय घ्यावा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे विरोधी पक्षांच्या इंडी आघाडीचा पंतप्रधानपदाचा चेहरा असतील, अशा बातम्या गेल्या काही दिवसांपासून येत आहेत. आघाडीची नुकतीच दिल्लीत एक बैठक पार पडली. या बैठकीत यावर चर्चा झाली. आगामी लोकसभा निवडणुकीत पंतप्रधानपदासाठी दलित चेहरा घेऊन भाजपाला आव्हान देण्याची इंडी आघाडीची तयारी असल्याचं सांगितलं जात आहे.**



इंडी आघाडीच्या बैठकीत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी खरगे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला आणि आघाडीतल्या अनेक पक्षांचा त्यास पाठिंबा असल्याचं म्हटलं जात आहे. परंतु, पंतप्रधानपदासाठी खरगेंच्या नावाचा विचार सुरू झाल्याने आघाडीतल्या काही नेत्यांमध्ये नाराजी असल्याचं बोललं जात आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नाराजीच्या चर्चांदरम्यान आता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शरद पवार हेदेखील नाराज असल्याचं वृत्त समोर आलं आहे. इंडी अघाडीच्या पंतप्रधानपदाच्या चेहऱ्याबाबत प्रश्न विचारल्यावर शरद पवार यांनी जुनं उदाहरण दिलं. शरद पवार म्हणाले, "१९७७ च्या लोकसभा निवडणुकीवेळी (आणीबाणीनंतर) विरोधकांच्या आघाडीचा पंतप्रधानपदाचा चेहरा ठरला नव्हता. निवडणुकीच्या निकालानंतर मोरारजी देसाई पंतप्रधान झाले. त्यावेळीदेखील असं म्हटलं जात होतं की, विरोधकांचं नेतृत्व कोण करणार हे ठरलं नाही. पंतप्रधानपदाचा चेहरा ठरला नाही तर निवडणुकीचे निकाल विरोधात लागतील. परंतु, तसं झालं नाही.

जनतेला बदल हवा असेल तर ते वेगळा निर्णय घेतात. जनता सत्ताबदलाच्या मनःस्थितीत असतील तर काहीही होऊ शकतं." इंडिया टूडेने यासंबंधीचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे. इंडि आघाडीला निमंत्रक किंवा समन्वयक असला पाहिजे, असा मुद्दा शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारच्या आघाडीच्या बैठकीपूर्वी उपस्थित केला होता. त्यानंतर तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीदेखील आघाडीच्या बैठकीत हाच मुद्दा उपस्थित केला. तसेच त्यांनी पंतप्रधानपदासाठी दलित चेहरा देण्याचा प्रस्ताव मांडला. त्यासाठी त्यांनी खरगेंचे नाव सुचवलं होतं. बैठकीत यावर कोणीही आक्षेप घेतला नाही. उलट, द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाचे प्रमुख आणि तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन, आम आदमी पार्टीचे प्रमुख आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी मल्लिकार्जुन खरगेंच्या नावाला पाठिंबा दर्शवला. आघाडीतल्या २८ घटक पक्षांपैकी १६ हून अधिक पक्षांनी खरगेंना पाठिंबा दिला असून यात शिवसेनेच्या ठाकरे गटाचाही समावेश असल्याचं बोललं जात आहे. नाराजीच्या चर्चांवर नितीश कुमार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. बिहारचे मुख्यमंत्री म्हणाले, आम्ही सगळे एकत्र येऊन काम करत आहोत. इंडिया आघाडीच्या पंतप्रधानपदासाठी खरगे यांच्या उमेदवारीबाबत नितीश कुमार म्हणाले, मी जरादेखील नाराज नाही. मी बैठकीत स्पष्टपणे सांगितलं की, ज्याला पंतप्रधान व्हायचं असेल त्याने व्हावं. माझीही इच्छा नव्हती. बैठकीत मी तेच सांगितलं आहे. मी कधीच पंतप्रधानपदाच्या उमेदवारीबाबत वक्तव्य केलेलं नाही.

### ठाकरेंचा खरगेंना पाठिंबा?

» इंडि आघाडीला निमंत्रक किंवा समन्वयक असला पाहिजे, असा मुद्दा शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारच्या आघाडीच्या बैठकीपूर्वी उपस्थित केला होता. त्यानंतर तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीदेखील आघाडीच्या बैठकीत हाच मुद्दा उपस्थित केला. तसेच त्यांनी पंतप्रधानपदासाठी दलित चेहरा देण्याचा प्रस्ताव मांडला. त्यासाठी त्यांनी खरगेंचे नाव सुचवलं होतं. बैठकीत यावर कोणीही आक्षेप घेतला नाही. उलट, द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाचे प्रमुख आणि तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन, आम आदमी पार्टीचे प्रमुख आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी मल्लिकार्जुन खरगेंच्या नावाला पाठिंबा दर्शवला. आघाडीतल्या २८ घटक पक्षांपैकी १६ हून अधिक पक्षांनी खरगेंना पाठिंबा दिला असून यात शिवसेनेच्या ठाकरे गटाचाही समावेश असल्याचं बोललं जात आहे.

# मोदी ठरले बेस्ट युट्यबर पंतप्रधान!

## » जगभरातील राजकारण्यांच्या पुढे पोहोचले मोदी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी हे त्यांच्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर तब्बल 20 दशलक्ष सबस्क्राइबर्स मिळवणारे पहिले जागतिक नेते ठरले आहेत. नरेंद्र मोदी यांच्या युट्युब चॅनेलवरच नव्हे तर सर्वच सोशल मीडियावर विविध प्रकारचे व्हिडीओ पाहायला मिळतात. यापूर्वीही मोदींनी सोशल मीडियावर आपली दमदार छाप पाडली होती. आणि आता या नव्या विक्रमासह मोदी भारतातली अन्य राजकीय नेत्यांच्याच नव्हे तर जगभरातील सर्व राजकारण्यांच्या पुढे पोहोचले आहेत.**




केवळ सबस्क्राइबर्स नाहीत तर व्हिडिओला मिळणाऱ्या एकूण व्ह्यूजची संख्या सुद्धा सर्व नेत्यांहून अधिक आहे. प्राप्त माहितीनुसार, नरेंद्र मोदी यांच्या चॅनेलवर आजपर्यंत ४.५ अब्ज (४५० कोटी) व्ह्यूज मिळाले आहेत. यातील बहुसंख्य व्ह्यूज हे केवळ भारतातीलच नसून जगभरातील प्रेक्षकांचे आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या युट्युब चॅनेलवर अंदाजे २३,००० व्हिडिओ असून यूट्यूबच्या पलीकडेही, त्यांचा प्रभाव इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲप सारख्या इतर प्लॅटफॉर्मवर विस्तारला आहे. यापूर्वी २०२२ मध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या युट्युब चॅनेलने एक कोटी सदस्यांचा टप्पा ओलांडला होता, आणि आता २०२३ च्या सरतेशेवटी मोदींच्या चॅनेलवरील सबस्क्राइबर्समध्ये आणखी १ कोटींची भर पडली आहे. यूट्यूबवर, पंतप्रधानांनी विविध प्रकारचे व्हिडिओ शेअर केले आहेत. ज्यामध्ये शासन, धोरणे आणि भाषणे यांचा समावेश आहे. मोदी सरकारच्या योजनांविषयी सुद्धा यातून माहिती दिली जाते तसेच काही योजनांचे यश सुद्धा यामाध्यमातून शेअर केले जाते. यूट्यूब व्यतिरिक्त, पंतप्रधान मोदी X, INSTAGRAM आणि WHATSAPP सारख्या इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे लोकांशी सक्रियपणे जोडलेले आहेत. दरम्यान, मोदींच्या पाठोपाठ दुसऱ्या क्रमांकावर ब्राझीलचे माजी राष्ट्रपती जैर बोल्सनोरा आहेत, ज्यांच्या सबस्क्राइबर्सची संख्या ६. ४ दशलक्ष इतकी आहे, खरं पाहायला गेलं तर ही संख्या मोदींच्या तुलनेत केवळ एक अंश आहे. तर जागतिक नेत्यांमध्ये तिसरे सर्वाधिक सबस्क्राइब केलेले चॅनल युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष (१. १ दशलक्ष) आहे तर या यादीत चौथ्या स्थानावर, युनायटेड स्टेट्सचे अध्यक्ष जो बायडन असून यांच्या YOUTUBE चॅनेलवर केवळ ७ लाख ९४ हजार सदस्य आहेत.

# तर काश्मीरची अवस्था गाझासारखी होईल!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

नॅशनल कॉन्फरन्सचे प्रमुख आणि खासदार फारूख अब्दुल्ला यांनी पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तानमधील संबंध सुधारण्यावर भाष्य केलं आहे. दोन्ही देशांनी आपसात असलेले वाद मिटवण्यासाठी संवाद साधायला हवा, असं म्हणत अब्दुल्ला यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे.

यावेळी अब्दुल्ला यांनी भारताचे माजी पंतप्रधान दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांच्या पाकिस्तानविषयीच्या भूमिकेचा आणि विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अलीकडच्या एका वक्तव्याचा उल्लेख करत मोदी यांना पाकिस्तानशी चर्चा करण्याचा सल्ला दिला आहे.

फारूख अब्दुल्ला म्हणाले, मी नेहमीच म्हटलं आहे की भारत आणि पाकिस्तानमधले वाद हे चर्चेतूनच मिटतील. अटल बिहारी वाजपेयी म्हणायचे, 'आपण मित्र बदलू शकतो. परंतु, आपल्याला आपला शेजारी बदलता येत नाही.' शेजाऱ्यांशी मैत्री ठेवली तर दोघांचीही प्रगती होईल. हे शत्रूत्व कायम राहिलं तर दोघेही मागे पडू.

मागे एकदा नरेंद्र मोदी म्हणाले होते, युद्ध हा आता पर्याय असू शकत नाही. आम्ही बातचीत करून प्रश्न मार्गी लावू. परंतु, आपण त्यांच्याशी (पाकिस्तान) चर्चा करतोय का? मला दोन्ही देशांमध्ये चर्चा होताना दिसत नाही. भारत आणि पाकिस्तानमध्ये कुठलीही चर्चा होत नाहीये, असं म्हणत फारूख अब्दुल्ला यांनी पंतप्रधान मोदी यांना काश्मीरबाबत इशारा दिला आहे. अब्दुल्ला म्हणाले, आता नवाज शरीफ हे पाकिस्तानचे पंतप्रधान होणार आहेत.

# डंकी-सालार 'पुढेही 'सॅम बहादूर' नाही झुकला!

बॉलीवूडचा प्रसिद्ध अभिनेता विकी कौशल हा नेहमीच त्याच्या वेगवेगळ्या भूमिकांसाठी ओळखला गेलेला अभिनेता आहे. त्याच्या मनमर्जिया, सरदार उधमसिंग, मसान, राझी या चित्रपटांमधील भूमिकांचे कौतुक झाले होते. बॉलीवूडमधील व्हर्सेटाईल अभिनेता म्हणून विकीचे नाव घेतले जाते. मेघना गुलजार दिग्दर्शित सॅम बहादूर चित्रपटावर प्रेक्षकांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. भारताचे फिल्ड मार्शल सॅम माणेकशॉ यांच्या आयुष्यावर आधारित सॅम बहादूरनं बॉक्स ऑफिसवर मोठा विक्रम केल्याचे दिसून आले आहे. खरं तर या चित्रपटाच्या जोडीला रणबीर कपूरचा ॲनिमल प्रदर्शित झाला होता. त्यानं बॉक्स ऑफिसवर सहाशे कोटींपेक्षा जास्त कमाई करुन



तुफान लोकप्रियता मिळवली होती. भलेही रणबीरच्या ॲनिमलच्या तुलनेत विकीच्या सॅम बहादूरची कमाई कमी असली तरी देखील त्यानं आपली यशस्वी घोडदौड कायम ठेवली आहे. सध्या बॉक्स ऑफिसवर किंग खान शाहरुखचा डंकी आणि प्रभासचा सालार धुमाकूळ घालत आहे. त्याला चाहत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. अशात विकीची सॅम बहादूर अजुनही प्रेक्षकांची पसंती मिळवताना दिसतो आहे. सॅम बहादूरनं जगभरातून आता शंभर कोटींचा टप्पा पार केल्याचे दिसून आले आहे. सॅकनिल्कच्या रिपोर्टनुसार सॅम बहादूरनं गेल्या २५ दिवसांमध्ये शंभर कोटींपेक्षा जास्त कमाई केल्याचे सांगण्यात येत आहे. फिल्मचे टोटल कलेक्शन ८५ कोटी ५ लाख रुपये एवढे आहे. तर जगभरातून कमाईचा आकडा ११८ कोटी ५० लाख रुपये एवढा आहे. विकीच्या सॅम बहादूरला आयएमडीबीकडून ८.२ असे रेटिंग मिळाले आहे तर जरा हटके जरा बचके ला ६.५ असे रेटिंग मिळाले आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सॅम बहादूरचे बजेट ५५ कोटी इतके होते.

# 'सुकेश' जॅकलीनशी संपर्क साधायचा तरी कसा?





कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करणारा सुकेश चंद्रशेखर गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. त्याचे नाव जॅकलीनसोबत जोडले जाऊ लागल्यानं त्याला वेगळेच वळण मिळाले होते. सुकेशनं आतापर्यत जॅकलीन आणि तिच्या कुटूंबियांना महागडे गिफ्ट्स दिल्याचे एका तपासातून समोर आले होते. दिल्लीनंतर तिहारच्या आणि त्यानंर मंडोलीच्या तुरुंगात बंदिस्त असलेल्या सुकेशनं जॅकलीनसोबत सातत्यानं संपर्क ठेवला आहे. त्यामुळे त्रस्त ठेवलेल्या जॅकलीननं आता दिल्ली पोलीस आणि कोर्टाकडे धाव घेतली आहे. जेलमध्ये एवढी कडक सुरक्षा असताना सुकेश कशाप्रकारे जॅकलीनशी संपर्क साधत होता याचे नेटकऱ्यांना कुतूहल असल्याचे दिसून आले आहे. दिल्ली पोलिसांनी पाचशे कोटींचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी सुकेशला अटक केली आहे. यानंतर सुकेशनं जॅकलीनला कित्येक विदेशी क्रमांकावरुन फोन केले होते. एवढेच नाही तर त्यानं कित्येक व्हाट्स अप चॅट देखील तिच्यासोबत केल्याचे समोर आले आहे. जॅकलीननं कोर्टाच्या एका सुनावणीमध्ये सांगितले होते की, त्यानं आपल्याला कोर्टात येताना ब्लॅक रंगाचा सूट परिधान करण्यास सांगितले होते. सुकेशनं जेलमधून जॅकलीनला ऑडिओ मेसेज देखील पाठवल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. आज तक च्या एका रिपोर्टममध्ये याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. मी जेव्हा त्यानं सांगितलेला ब्लॅक रंगाचा सूट परिधान केला नाही तेव्हा तो माझ्यावर खूपच नाराज झाला होता. त्यानं चिडून मला मेसेजही केला होता. सुकेशनं जेलमधून मोबाईलचा वापर केल्याचे दिसून आले आहे. सुकेशनं आपल्याला सतत मेसेज करुन लव्हशिपसाठी पुढाकार घेतला होता. तो त्याविषयी बोलायचा. मी तो विषय टाळल्यास त्यानं रागानं मला धमक्याही दिल्याचे जॅकलीननं त्या सुनावणीमध्ये सांगितले आहे.

# त्यांनी थोडी गुन्हा केला

बॉलीवूड अभिनेता अरबाज खान काही दिवसांपासून चर्चेत आहे अरबाज खानने 24 डिसेंबर रोजी मेकअप आर्टिस्ट शूरा खानसोबत दुसरे लग्न केले आहे. हा निकाह बहीण अर्पिता खानच्या मुंबईतील घरी पार पडला आहे. या आनंदात सामील होण्यासाठी अरबाज खानचा मोठा भाऊ आणि बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खानसह त्याचे संपूर्ण कुटुंब उपस्थित होते. तर अरबाजचा मुलगा अरहानही त्याच्या लग्नात नाचताना दिसला. अरबाद आणि शूराच्या लग्नाचे फोटो आणि व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अरबाज आणि शूराने त्यांच्या नात्याबद्दल मौन पाळले होते. कुणाला या लग्नाची कल्पना नव्हती. आता अरबाजचे वडील सलीम खान यांनी मुलाच्या लग्नानंतर प्रतिक्रिया दिली आहे. लग्न करणे हा कोणताही गुन्हा नाही. त्यांच्या निर्णयामुळे आम्ही सर्वच आनंदी असल्याचे त्यांनी सांगितले. न्यूज 18 शी बोलताना सलीम खान म्हणाले की, "त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला.

# रियाला कोर्टाचा मोठा दिलासा !

प्रसिद्ध अभिनेत्री रिया चक्रवर्तीच्या बाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. त्यात मुंबई उच्च न्यायालयानं रियाला दिलासा दिला आहे. रियाच्या परदेशवारीवर निर्बंध घालण्यात आले होते. यापुढील काळात रियाला परदेशात जाता येणार असून त्यावर कोणत्याही प्रकारची बंदी असणार नाही. असे कोर्टानं सांगितले आहे. बॉलीवूडचा दिवंगत अभिनेता सुशांत सिंग राजपूतच्या आत्महत्या प्रकरणानंतर रिया ही नेहमीच वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत राहिली आहे. तिची वेगवेगळ्या तपास यंत्रणांनी देखील चौकशी केली आहे. काही दिवसांपूर्वी सीबीआयकडून रियाच्या विरोधात लूक आऊट नोटीस जाहीर करण्यात आली होती. त्यात तिला परदेशी जाण्यास मज्जाव करण्यात आला होता. यावर हायकोर्टानं तिला दिलासा दिला आहे. रियानं मुंबई उच्च न्यायालयात सीबीआयच्या लूक आऊट नोटीशीच्या विरोधात याचिका दाखल केली होती. त्यात तिनं आपल्याला परदेशी प्रवास करण्यास परवानगी देण्यात यावी. अशी मागणी तिनं कोर्टाकडे केली होती. कोर्टानं आता तिला परदेश प्रवासासाठी परवानगी दिली आहे. यामुळे रियाला दुबईतील एका ब्रँडच्या इव्हेंटसाठी जाता येणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार कोर्टानं रियाला २७ डिसेंबर ते २ जानेवारी दरम्यान विदेश यात्रा करण्याची परवानगी दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून सीबीआयच्या लूक आऊट नोटीशीमुळे रिया ही अडचणीत सापडली होती.



# उर्फी रेस्टोबॉरमध्ये झाली वेटर; खरं कारण सांगताच लोकांनी केलं कौतुक

उर्फी जावेद तिच्या अतरंगी फॅशनमुळे सोशल मीडियावर चर्चेत असते. उर्फीच्या फॅशनचं कौतुक कमी तर टिका जास्त होत असते. पण अशातच एका कारणामुळे उर्फीचं कौतुक झालंय. मुंबईतील रेस्टोबार 'द नाइन्स' इथला उर्फी जावेदचा वेटर बनल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. ती वेटर का बनली होती? हा प्रश्न सगळ्यांना पडला होता. पण आज उर्फीने स्वतःच या व्हिडिओमागचं खास कारण सांगितलं आहे. उर्फीच्या व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये ती वेटर बनून लोकांना प्रेमाने जेवण सर्व्ह करताना दिसतेय. याशिवाय ती लोकांसोबत आपुलकीने गप्पा मारतानाही दिसतेय. उर्फीचा वेटर बनल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यापासून यावर अनेक प्रतिक्रिया आल्या. आज तिने इंस्टाग्रामवर ही खास गोष्ट उघड करताना सांगितलं की, तिने कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशनसाठी निधी उभारण्यासाठी वेट्रेस होण्याचा



निर्णय घेतला होता. तिच्या

व्हायरल झालेल्या व्हिडिओ

कॅप्शनमध्ये तिने खुलासा केला आहे. उर्फी लिहीते, "स्वप्न साकार झालं! कोणतेही काम मोठे किंवा लहान नसते. ते सर्व दृष्टीकोनावर अवलंबून असते. मला एक तास वेट्रेस म्हणून काम करायचं होत आणि कॅन्सर पेशंट एड असोसिएशनमध्ये निधी देण्यासाठी मी ही हक्काची कमाई केली. @ CPAAINDIA @SUVED @ THENINESMUMBAI यांना हे घडवून आणल्याबद्दल त्यांचे खूप आभार." असं कॅप्शन देत उर्फीने हा खुलासा केलाय. अभिनेत्री उर्फी जावेदचे हे पाऊल अनेकांना प्रेरणा देणारे आहे. तिला या ख्रिसमसमध्ये काहीतरी अर्थपूर्ण करुन सिक्रेट सांता बनून लोकांना मदत करायची होती.

तिने त्या रात्री हॉटेलमधल्या कर्मचाऱ्यांशी खूप छान संवाद साधला. याशिवाय तिने काही टिप्स घेतल्या. या टिप्सचा वापर ती आता कर्करोगाच्या रुग्णांना मदत करण्यासाठी करणार आहे.

# भारताची फलंदाजी ढेपाळली

## » विराट, रोहितनं नांगी टाकली, रबाडाचा पंच

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**बॉक्सिंग डे कसोटीत आफ्रिकेच्या गोलंदाजीसमोर भारताची फलंदाजी ढेपाळली. कगिसो रबाडाने भेदक मारा करत भारताच्या फलंदाजांना तंबूत धाडले. भारताने 177 धावांत सात विकेट गमावल्या आहेत. आता सर्व मदार केएल राहुल याच्यावर आहे. आफ्रिकेकडून कगिसो रबाडा याने पाच विकेट घेतल्या आहेत.**

बॉक्सिंग डे कसोटीत आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बवुमा याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. आफ्रिकेच्या भेदक माऱ्यापुढे टीम इंडियाची सुरुवात अतिशय खराब झाली. कर्णधार रोहित शर्मा स्वस्तात तंबूत परतला. त्याला कगिसो रबाडा याने बाद केला. शुभमन गिल आणि यशस्वी जायस्वाल यांनाही मोठी खेळी करता आली नाही. शुभमन दिल दोन धावा काढून बाद झाला तर यशस्वी जायस्वाल 17 धावांवर तंबूत परतला. कर्णधार रोहित शर्मा याला फक्त पाच धावा करता आल्या. 24 धावांत भारताचे तीन फलंदाज तंबूत परतले, त्यानंतर अनुभवी विराट कोहलीने श्रेयस अय्यरच्या साथीने भारताच्या डावाला आकार दिला. विराट आणि अय्यर यांनी अर्धशतकी भागिदारी केली. आता ही जोडी मोठी भागिदारी करेल, असा अंदाज वर्तवला जात होता. पण त्याचवेळी रबाडाने श्रेयस अय्यरला क्लीन बोल्ड केले. श्रेयस अय्यरने 50 चेंडूत 31 धावांची खेळी केली. यामध्ये एक षटकार आणि तीन चौकारांचा समावेश आहे. अय्यर बाद झाल्यानंतर केएल राहुल आणि विराट कोहली मैदानात होते. दोघांनाही भागिदारी करण्याचा प्रयत्न केला, पण रबाडाने विराट कोहलीला झेलबाद करत भारताच्या आशेवर पाणी फेरले. विराट कोहलीने 64 चेंडूत 38 धावांची खेळी केली. यामध्ये पाच चौकारांचा समावेश होता. विराट बाद झाल्यानंतर केएल राहुल याने संयमी फलंदाजी सुरु ठेवली. केएल राहुल याने अर्धशतक ठोकलेय. विराट बाद झाल्यानंतर अश्विनलाही मोठी खेळी करता आली नाही. अश्विन फक्त आठ धावा काढून बाद झाला. राहुल याने शार्दुल ठाकूरच्या साथीने भारताच्या डावाला आकार देयाचा प्रयत्न केला. दोघांची जोडी जमली होती, पण पुन्हा एकदा रबाडाने ही जोडी फोडली. शार्दूल ठाकूर 24



धावा काढून तंबूत परतला. शार्दूल ठाकूर याने तीन चौकारांच्या मदतीने 24 धावांचं योगदान दिले. सध्या केएल राहुल आणि जसप्रीत बुमराह मैदानावर आहेत. आफ्रिकेकडून कगिसो रबाडा सर्वात धोकादायक ठरला. रबाडाने पाच फलंदाजांना तंबूत पाठवलं. त्यामध्ये रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर, अश्विन आणि शार्दूल यांचा सावेश आहे. एन बर्गर याला दोन विकेट मिळाल्या. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीच्या पहिल्या दिवशी भारताने पहिल्या डावात तीन गड्यांच्या मोबदल्यात ९१ धावा केल्या आहेत. विराट कोहली ३३ आणि श्रेयस अय्यर ३१ धावांवर नाबाद आहे. दोघांनी चौथ्या विकेटसाठी ६७ धावांची भागीदारी केली. उपाहारापूर्वी भारताला तीन धक्के बसले. यशस्वी जैस्वाल १७ धावा करून, रोहित शर्मा पाच धावा करून आणि शुबमन गिल दोन धावा करून बाद झाले. नांद्रे बर्गरने दोन गडी बाद केले. कागिसो रबाडाला यश मिळाले आहे. बॉक्सिंग डे कसोटीत आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बवुमा याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. आफ्रिकेच्या भेदक माऱ्यापुढे टीम इंडियाची सुरुवात अतिशय खराब झाली. कर्णधार रोहित शर्मा स्वस्तात तंबूत परतला. त्याला कगिसो रबाडा याने बाद केला. शुभमन गिल आणि यशस्वी जायस्वाल यांनाही मोठी खेळी करता आली नाही. शुभमन दिल दोन धावा काढून बाद झाला तर यशस्वी जायस्वाल 17 धावांवर तंबूत परतला. कर्णधार रोहित शर्मा याला फक्त पाच धावा करता आल्या. 24 धावांत भारताचे तीन फलंदाज तंबूत परतले, त्यानंतर अनुभवी विराट कोहलीने श्रेयस अय्यरच्या साथीने भारताच्या डावाला आकार दिला. विराट आणि अय्यर यांनी अर्धशतकी भागिदारी केली. आता ही जोडी मोठी भागिदारी करेल, असा अंदाज वर्तवला जात होता. पण त्याचवेळी रबाडाने श्रेयस अय्यरला क्लीन बोल्ड केले. श्रेयस अय्यरने 50 चेंडूत 31 धावांची खेळी केली. यामध्ये एक षटकार आणि तीन चौकारांचा समावेश आहे. अय्यर बाद झाल्यानंतर केएल राहुल आणि विराट कोहली मैदानात होते. दोघांनाही भागिदारी करण्याचा प्रयत्न केला, पण रबाडाने विराट कोहलीला झेलबाद करत भारताच्या आशेवर पाणी फेरले. विराट कोहलीने 64 चेंडूत 38 धावांची खेळी केली.

### रबाडा ठरला सर्वात धोकादायक

» दोघांनाही भागिदारी करण्याचा प्रयत्न केला, पण रबाडाने विराट कोहलीला झेलबाद करत भारताच्या आशेवर पाणी फेरले. विराट कोहलीने 64 चेंडूत 38 धावांची खेळी केली. यामध्ये पाच चौकारांचा समावेश होता. विराट बाद झाल्यानंतर केएल राहुल याने संयमी फलंदाजी सुरु ठेवली. केएल राहुल याने अर्धशतक ठोकलेय. विराट बाद झाल्यानंतर अश्विनलाही मोठी खेळी करता आली नाही. अश्विन फक्त आठ धावा काढून बाद झाला. राहुल याने शार्दुल ठाकूरच्या साथीने भारताच्या डावाला आकार देयाचा प्रयत्न केला. दोघांची जोडी जमली होती, पण पुन्हा एकदा रबाडाने ही जोडी फोडली. शार्दूल ठाकूर 24 धावा काढून तंबूत परतला. शार्दूल ठाकूर याने तीन चौकारांच्या मदतीने 24 धावांचं योगदान दिले. सध्या केएल राहुल आणि जसप्रीत बुमराह मैदानावर आहेत. आफ्रिकेकडून कगिसो रबाडा सर्वात धोकादायक ठरला. रबाडाने पाच फलंदाजांना तंबूत पाठवलं. त्यामध्ये रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर, अश्विन आणि शार्दूल यांचा सावेश आहे.

# रोहित शर्मा टी20 विश्वचषकात खेळणार की नाही?

## » टी-20 विश्वचषकात टीम इंडियाचे नेतृत्व कोण करणार?

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्माने (ROHIT SHARMA) 2024 च्या टी20 वर्ल्डकपबाबत (T20 WORLD CUP) मोठे वक्तव्य केले आहे. एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात झालेल्या पराभवानंतर कर्णधार रोहित शर्माने पहिल्यांदाच पत्रकार परिषद घेतली.**

टीम इंडिया आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान होणाऱ्या दोन



सामन्यांच्या कसोटी मालिकेला आज (26 डिसेंबर) सुरुवात होणार आहे. त्यापूर्वी रोहित शर्माने ही पत्रकार परिषद घेतली आहे. 2024 च्या टी 20 विश्वचषकात टीम इंडियाचे नेतृत्व कोण करणार? असा प्रश्न रोहित शर्माला विचारण्यात आला होता. यावर बोलताना रोहित शर्मा म्हणाला, "मला माहिती आहे की, तुम्हाला काय जाणून घ्यायचे आहे. तुम्हाला याबाबत लवकरच समजेल. क्रिकेट खेळण्यासाठी मी आतूर आहे. संघातील प्रत्येकाला चांगली कामगिरी करायची आहे. टी20 विश्वचषकात भारतीय क्रिकेट संघाचे नेतृत्व कोण करणार? हे अद्याप समजू शकलेले नाही. दरम्यान, रोहित शर्माला टी20 सामना खेळून वर्ष उलटलं आहे. नोव्हेंबर 2022 मध्ये त्याने शेवटचा टी20 सामना खेळला होता. रोहितने हा सामना इंग्लंडविरुद्ध खेळला होता. इंग्लडविरुद्धच्या या सामन्यात टीम इंडियाला 10 विकेट्सनी पराभव पत्करावा लागला होता. यानंतर टी20 क्रिकेटमध्ये हार्दिक पांड्यानेच भारतीय क्रिकेट संघाचे नेतृत्व केले आहे. 2023 च्या वनडे विश्वचषकात हार्दिक पांड्या जखमी झाल्यानंतर सुर्यकुमार यादवकडे भारतीय क्रिकेट संघाचे नेतृत्व देण्यात आले आहे. वनडे विश्वचषकानंतर रोहित शर्मा आणि विराट कोहलीला विश्रांती देण्यात आली होती. ऑस्ट्रेलिया आणि आफ्रिकेविरुद्ध खेळवण्यात आलेल्या मालिकेसाठी टीम इंडियाने रोहित आणि विराटला विश्रांती दिली होती. आता भारतीय संघ जानेवारीमध्ये अफगाणिस्तानविरोधात पुढील टी 20 मालिका खेळणार आहे. या मालिकेत रोहित आणि विराट खेळताना दिसणार की दोघांना विश्रांती देण्यात येणार? याकडे सर्वांचे लक्ष आहे.

### इंडियाचे नेतृत्व कोण करणार?

» 2024 च्या टी 20 विश्वचषकात टीम इंडियाचे नेतृत्व कोण करणार? असा प्रश्न रोहित शर्माला विचारण्यात आला होता. यावर बोलताना रोहित शर्मा म्हणाला, "मला माहिती आहे की, तुम्हाला काय जाणून घ्यायचे आहे. तुम्हाला याबाबत लवकरच समजेल. क्रिकेट खेळण्यासाठी मी आतूर आहे.